सत्यमेव जयते

# उमेदवारांसाठी महत्वपुर्ण सूचना

1. सदर परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतली जाईल. ऑनलाईन परीक्षेच्या स्थळात (Site) प्रवेश करण्यासाठी आपणास दिलेला यूजर आय-डी / पासवर्ड नमूद करावा लागेल. संगणकावर दिसणारे तुमचे नांव आणि इतर तपशील बरोबर आहे याची पडताळणी करावी. आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेला यूजर आयडी / पासवर्ड बाबत गुप्तता पाळणे आवश्यक आहे.

2. **कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सद्यस्थितीत वैध असे मूळ स्वरूपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नाव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल)ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो/नाव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसूचना/विवाह प्रमाणपत्र/राजपत्रित शपथपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.**

3. फोटो व बायोमॅट्रिक डाटा (अंगठय़ाचा ठसा) परीक्षेच्या ठिकाणी परीक्षेपूर्वी घेतला जाईल. या संदर्भात खालील दिलेले मुद्दे लक्षात ठेवा :-
   (1) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.
   (2) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटे सुकली आहेत याची खात्री करून घ्या.
   (3) दोन्ही हातांची बोटे सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोटे ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.
   (4) ठसा घेतल्या जाणा-या अंगठय़ाला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.
   (उमेदवाराने उपरोक्त मुद्यांचे पालन न केल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

4. फ्रिस्किंगमध्ये वेळ वाचविण्यासाठी (मेटल डिटेक्टरचा वापर केला जाईल) उमेदवारांना खालील ड्रेस कोडचे पालन करण्याचा सल्ला दिला जात आहे:
   - हलके कपडे जे कोणतीही साधने किंवा संपर्काची उपकरणे लपविण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही.
   - अर्धी बाही असलेले कपडे पण त्यावर कोणतीही मोठी बटणे, बॅजेस, ब्रुचेस इ. नसावीत ज्यांचा वापर संपर्क साधन, ब्लूटूथ, कॅमेरा इ. लपविण्यासाठी केला जाऊ शकेल.
   - स्लीपर/सँडल वापरावे आणि बूट/मोजे टाळावे.
   - धातूचे बटन, चेन इ. नसलेले हलके कपडे वापरावेत.
   - पारंपारिक / धार्मिक पोशाख घालून येणा-या उमेदवारांनी आणि दिव्यांग उमेदवारांनी फ्रिस्किंग साठी रिपोर्टिंगच्या वेळेपूर्वी अगोदरच केंद्रावर उपस्थित व्हावे.

5. परीक्षेच्या स्वरुपाबद्दल माहिती/सूचना देणारी पुस्तिका (Information Handout) **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालय, धुळे**च्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्या वेबसाईट वरून उमेदवाराने ती डाऊनलोड करुन घ्यावी आणि तिचे काळजीपूर्वक अध्ययन करावे.

6. **पर्यवेक्षकाच्या उपस्थितीत** उमेदवारांनी प्रवेशपत्रावर विहित ठिकाणी त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा **स्पष्टपणे** उमटवावा व स्वाक्षरी करावी.

7. उमेदवाराने सोबत **बॉल पॉइंट पेन आणावयाचे आहे**. उमेदवार स्वतःसोबत निळे/काळे स्टँप इंक पॅड आणू शकतील. कच्चे काम करण्यासाठी कागद पुरविले जातील. **परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेश पत्रासह पर्यवेक्षकाकडे जमा करावे लागतील.**

8. तुम्हाला सदर ऑनलाईन परिक्षेस बसण्यासाठी तुमचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. ची **सत्यता न तपासता** अनुमति देण्यात आली आहे. परीक्षेला बसण्यापूर्वी जाहिरातीमध्ये नमुद केलेली सर्व पात्रता व निकष पूर्ण करत आहोत हे पडताळून बघण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील. निवड झालेला उमेदवार कागदपत्रांची पुर्तता करण्यास अपात्र आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द केली जाईल.

9. **बरोबर आणि चुकीच्या उत्तरांमधील सारखेपणाचे आकृतीबंध उघडकीस आणण्यासाठी तुमच्या प्रतिसादांचे (उत्तरांचे) अन्य उमेदवारांच्या प्रतिसादांबरोबर विश्लेषण केले जाईल. ह्या संदर्भात वापरलेल्या विश्लेषणात्मक पध्दतीमध्ये जर असे अनुमान निघाले/आढळून आले की, प्रतिसादांचे (उत्तरांचे) आदान प्रदान झालेले आहे अणि मिळवलेले गुण हे यथार्थ/स्विकारण्यायोग्य नाहीत, तर तुमची उमेदवारी रद्द करण्यात येईल किंवा निकाल राखून ठेवला जाईल.**

10. **हया प्रवेशपत्रावर छापलेल्या वेळेच्या 15 मिनिटे अगोदर उमेदवारास परीक्षास्थानी उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशीरा येणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेस बसू दिले जाणार नाही.**

11. पुस्तके, वह्या, परिगणक यंत्र (Calculator), पेजर, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, ब्ल्युटूथ किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस सारखी साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वतःजवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

12. परीक्षेचा दिनांक / सत्र / परीक्षा स्थान यामधील कोणत्याही बदलाच्या विनंतीची **दखल घेतली जाणार नाही**.

13. सदर प्रवेशपत्र म्हणजे **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालय, धुळे** द्वारे नोकरीची हमी नव्हे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

14. उमेदवाराच्या निवडी संदर्भात उमेदवाराकडून किंवा उमेदवाराच्या वतीने होणारा कोणताही प्रचार किंवा राजकीय किंवा बाह्य दबाव केला गेल्यास उमेदवारास अपात्र समजले जाईल.

15. कृपया नोंद घ्यावी की कोणताही उमेदवार परीक्षेसाठी एकाच वेळी उपस्थित राहू शकतो/ते. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास उमेदवारांना प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या दिवशी व वेळी एकदाच परीक्षेस उपस्थित राहण्याचा सल्ला दिला जातो.

16. परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये ऐनवेळेस काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येणार नाही. अशा प्रसंगी असा व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुसऱ्या जागेस हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेण्याबाबतचा परीक्षा घेणाऱ्या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम राहील. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करणार नाही. या विलंबित झालेल्या प्रक्रियेस उमेदवार एका जागेवरून दुसऱ्या जागेवर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधुन संपूर्णपणे वगळण्यात येईल.

17. परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागामध्ये उघड करणे, प्रकाशीत करणे, पुन्हा निर्माण करणे, ट्रांसमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षा केंद्रामध्ये दिला जाणारा कागद घेऊन जाणारे, किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

18. दिव्यांग व्यक्तींनी (PWD) त्यांच्या बैठक-व्यवस्थेविषयीच्या माहितीसाठी परिक्षेच्या 30 मिनिटे आधी चाचणी केंद्र प्रशासकांशी संपर्क साधावा.

19. उमेदवारास सदर परीक्षेस स्वःखर्चाने यावे लागेल आणि कोणताही प्रवास खर्च/भत्ता दिला जाणार नाही.

20. उमेदवाराने स्वतःच्या जोखमीवर ऑनलाईन परिक्षेस उपस्थित राहावे. **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालय, धुळे** कोणत्याही प्रकारच्या हानीस अथवा दुखापतीस जबाबदार राहणार नाही.

21. उमेदवारांना सल्ला दिला जातो की त्यांनी “The Public Examinations (Prevention of Unfair Means) Act, 2024” ची नोंद घ्यावी.

22. पुढील पानावर दिलेल्या सामाजिक अंतर संबधीच्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

# सामाजिक अंतर संबंधी सूचना

1. उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश पत्रात दिलेल्या वेळेनुसार उपस्थित रहायचे आहे. उशीरा येणा-या उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

2. उमेदवारांचे परीक्षा अनुक्रमांक व लॅब क्रमांक परीक्षा केंद्राच्या बाहेर दर्शविले जाणार नाही, प्रत्येक उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश करते वेळी यासंबंधी माहिती दिली जाईल.

3. परीक्षा केंद्रावर उमेदवारास आवश्यक लागणारे सामान
**परीक्षा केंद्रावर उमेदवारास केवळ ठराविक खालील आणण्याची परवानगी असेल:**
**अ. मास्क**
**ब. स्वतःचे हँड सॅनिटाइज़र (50 मिली.)**
**क. एक सामान्य पेन आणि स्टँप इंक पॅड (नीळे अथवा काळे)**
**ड. परीक्षा संबंधी कागदपत्रे (प्रवेश पत्र तसेच ID कार्डची प्रत जोडलेले प्रवेश पत्र, सत्यता तपासण्यासाठी मूळ ID कार्ड)**
**इ. लेखनिक (स्क्राइब) वापरणा-या उमेदवारांसाठी - व्यवस्थितरीत्या लिहिलेला व हस्ताक्षर केलेला स्क्राइब फॉर्म**
**परीक्षा केंद्राच्या आत अन्य कोणतेही सामान नेण्याची परवानगी नसेल.**

4. उमेदवाराने आपले कुठलेही साधन/सामग्री इतरांना वापरण्यास देऊ नये.

5. उमेदवारांनी अन्य उमेदवारांसोबत सामाजिक अंतर राखणे गरजेचे आहे.

6. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सांगितलेल्या सूचनेनुसार रांगेत उभे राहावे.

7. उमेदवार जर लेखनीकाच्या सुविधेचा लाभ घेणार असेल तर लेखनीकाला सुद्धा स्वतःचा मास्क आणावा लागेल.

8. परीक्षा संपल्यावर उमेदवारांनी परीक्षा स्थळावरील स्टाफ द्वारा केलेल्या सूचनेनुसार गर्दी न करता व्यवस्थितरीत्या केंद्राबाहेर पडायचे आहे.

## परिक्षेकरीता हार्दिक शुभेच्छा!